# बहिणी म्हणे फडकती ध्वजा

## संत बहिणाबाई : संक्षिप्त चरित्र आणि अभंगसंग्रह



ई साहित्य प्रतिष्ठान

# बहिणी म्हणे फ़डकती ध्वजा

संत बहिणाबाई : संक्षिप्त चरित्र आणि निवडक अभंग

ई साहित्य प्रतिष्ठान

“बहिणी म्हणे फ़डकती ध्वजा” हे पुस्तक विनामूल्य वाचनासाठी आहे. त्यावर सर्वांचा कायदेशीर अधिकार आहे. या पुस्तकातील सर्व साहित्य हे विविध वेबसाईट्सवरून घेतले आहे. त्या त्या वेबसाईट्सचे आम्ही आभारी आहोत. हे पुस्तक जास्तीत जास्त लोकांना वाटण्याचे अधिकार व जबाबदारी आम्ही आपल्याकडे देत आहोत.

ई साहित्य प्रतिष्ठान हे नवीन लेखक कवींना जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोहोचण्याचे साधन आहे. तसेच सुमारे दोन लाख वाचकांसाठी दर्जेदार साहित्य विनामूल्य नियमितपणे मिळण्याचे साधन आहे. सुमारे दोन लाख मराठी वाचक ई मेल द्वारे व वेबसाईट्द्वारे ई साहित्य प्रतिष्ठानच्या पुस्तकांचा आस्वाद घेत असतात.

भावार्थ ज्ञानेश्वरी, छत्रपती शिवाजी, शंभूराजे, मावळे, विवेकानंद, सावरकर, जातककथा आदि विषयांवरची पुस्तकंही तरूण मराठी मुलांपर्यंत आणण्याचं काम ई साहित्य प्रतिष्ठान करतं. दर आठवड्याला नवनवीन पुस्तकं प्रकाशित करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानला आपल्या सहकार्याची गरज आहे.

नवीन साहित्यासाठी.

नवीन वाचकांसाठी.

मराठीला नवीन क्षितिजांशी नेण्यासाठी.

# कळकळीची विनंती

आजचा काळ जागतिकीकरणाचा आहे. जागतिक किर्तीच्या विद्वानांचे साहित्य आता सहजासहजी उपल्ब्ध होते आहे. त्याचबरोबर आपल्याकडील महान विचारवंतांचे विचारही जगभर पसरत आहेत.

२३०० वर्षं जुन्या असलेल्या मराठी भाषेतही ज्ञानोबा तुकारामांसारखे महान संत आहेत. त्यांचे साहित्य जागतिक दर्जाचे आहे. हे संत मोठमोठ्या गोष्टी, अगदी सहज साध्या भाषेत सांगतात. क्लीष्ट भाषेत, बोजड करून सांगत नाहीत. मग त्याचं भाषांतर वाचून अमेरिकेतले विद्वान जी पुस्तकं लिहितात ती जगभरात बेस्ट सेलर होतात. गुरुदेव टागोरांनी नोबेल पारितोषिक विजेती गीतांजली लिहिण्याआधी तुकारामांचे अभंग वाचले आणि बंगालीत भाषांतरित केले. गुरुदेव रविंद्रनाथांचे बंधू सत्येंद्रनाथ हे पहिले भारतीय ICS सनदी अधिकारी. ते १८७१ साली अहमदनगर, सातारा, पुणे आणि मुंबई भागात होते. त्या काळात त्यांनी तुकारामांचे अभंग वाचले आणि ते प्रभावित झाले. त्यानंतर त्यांनी व त्यांचे भाऊ रविंद्रनाथ यांनी तुकारामाच्या अनेक अभंगांचे “तुकोबा” या नावाने बंगाली व नंतर इंग्रजी भाषांतर केले. व याच प्रभावाखाली त्यांनी गीतांजली लिहिली. गीतांजलीच्या अनेक कवितांवर तुकारामांची छाप आहे. गीतांजलीचे इंग्रजी भाषांतर वाचून यिट्स हा इंग्लीश कवी प्रभावित झाला. त्यातले मानवतावादी आणि भूतदयावादी तत्त्वज्ञान ते लोक प्रथमच वाचत होते. एका वर्षातच त्याची फ्रेंच, जर्मन आदी दहा भाषांत भाषांतरे झाली. खुद्द गांधीजींनी तुकारामाच्या अभंगांचे भाषांतर केले.

पण आम्ही मराठी मंडळी मात्र तुकाराम आणि ज्ञानेश्वर शाळेतल्या पुस्तकात नाईलाजाने वाचतो. आणि नंतर तिकडे वळूनही बघत नाही. ज्या तुकाराम महाराजांनी छत्रपतींनी पाठवलेला नजराणा नम्रपणे नाकारला आणि महाराजांना क्षात्रधर्माचा उपदेश केला. तेच तुकाराम महाराज आणि त्यांच्यासारखे संत आपल्यासाठी हजारो अभंगांचा नजराणा ठेवून गेले आहेत. त्यातली प्रत्येक ओळ, शब्द म्हणजे जीवनाचा मार्ग दाखवणारा प्रकाश झोतच आहे. पण हा नजराणा आपण अजाणपणे नाकारत आहोत.

मित्रहो, मराठीतले असे अनमोल संतसाहित्य आपल्या प्रत्येकाच्या घरी असले पाहिजे. वाचनात असले पाहिजे. आणि आचरणात आले पाहिजे. कारण आज जग आपल्या या खजिन्याने श्रीमंत होत आहे. आणि जर आपण हा खजिना रद्दीत टाकू तर आपल्यासारखे करंटे आपणच ठरू. हे पुस्तक आपल्या जास्तीत जास्त मित्रांना आणि नातेवाईकांना पाठवा. प्रत्येक मराठी माणसाला हे मिळू दे.

संतसाहित्य विनामूल्य आहे. अमूल्य आहे. येणाऱ्या पिढ्यांना नवा मार्ग दाखवण्याची क्षमता यात आहे.

चला तर. लागा कामाला. करा फ़ॉरवर्ड. प्रत्येक मराठी माणसाच्या लॅपटॉप, टॅब्लेट, डेस्कटॉपवर आणि मोबाईलमध्ये संतांची गाथा असलीच पाहिजे.

आपले नम्र

टीम ई साहित्य

# अनुक्रम

संत बहिणाबाई : संत कथा

बहिणाबाई : मराठी विकीपिडिया

Bahinabai : Wikipedia

क्रांतिकारी संत बहिणाबाई : शामसुंदर सोन्नर (प्रहार)

वारकरी ध्वजा : बहिणाबाई : श्रीरंग गायकवाड (ब्लॉग)

बहिणाबाई : माधवी कुंटे (महाराष्ट्र टाईम्स)

Sant Bahinabai : Hindupedia

संत बहिणाबाईंचे अभंग

# संत बहिणाबाई

शके १५५१

बहिणाबाईंचा जन्म वेरुळच्या पश्चिमेकडे, वैजापूर तालुक्यातील देवगाव (रंगाऱ्याचे) येथे झाला. त्यांच्या आईचे नाव जानकी व पित्याचे नाव आऊजी कुलकर्णी. बहिणाबाई या वारकरी संप्रदायाच्या शेवटच्या संत कवयित्री. त्यांचे लग्न वयाच्या तिसऱ्या वर्षीच झाले. त्यांचा नवरा बिजवर होता. त्याचे वय तीस वर्षाचे होते. त्यामुळे बहिणाबाई यांच्या वाट्याला जास्तच दु:ख आले.

एकदा संत तुकारामाचा अभंग त्यांच्या वाचनात आला. बहिणाबाई यांच्या वाचनात आला. बहिणाबाईंनी सात दिवस तुकाराम महाराजांचा ध्यास घेतला. सातव्या दिवशी त्यांना तुकाराम महाराजांच्या स्वप्न-साक्षात्कार झाला.

तुकारामरुपे घेऊनि प्रत्यक्ष ।
म्हणे पूर्वसक्ष सांभाहीजे ।
ठेविलया कर मस्तकी बोलिला ।
मंत्र सांगितला कर्णरंध्री ॥
तुषितांची जैसे आवड जीवन ।
तैसा पिंड प्राणविण तया ।
बहिणी म्हणे हेतू तुकोबाचे ठायी ।
ऐकोनिया देही पदे त्यांची ॥

http://www.santkatha.com/sant-bahinabai.php

# बहिणाबाई

विकीपिडिया

जन्म (इ.स. १६२९/३० (शके १५५१) – मृत्यू २ ऑक्टोबर १७००) संत तुकारामांच्या समकालीन पुढच्या पिढीतील वारकरी संप्रदायातील मराठी स्त्री संत कवी आणि संत तुकारामांच्या शिष्या.

स्त्री संत मालिकेतील अग्रेसर मुक्ताबाई, कान्होपात्रा, जनाबाई, वेणाबाई, आक्काबाई, मीराबाई यांसह बहिणाबाईंचे स्थान मानावे लागेल.

जीवन

बहिणाबाईंचा जन्म, गोदावरीच्या उत्तरेस घृष्णेश्वराच्या पश्चिमेस, वैजापूर तालुक्यातील देवगांव (रंगाऱ्याचे) येथे शके १५५१ मध्ये ब्राम्हण कुटुंबात झाला. तिच्या आईचे नांव जानकी व पित्याचे नांव आऊजी. माता-पित्यानी तिचा विवाह वयाच्या पाचव्या वर्षी त्याच गावातील पाठक कुटुम्बात लावला.

संत बहिणाबाईना लहानपणापासुनच परमार्थाची व भक्तीची ओढ होती. कथा – कीर्तने, पुराण-श्रवण आणि सत्पुरूषांची सेवा यात संत बहिणाबाई रमली होती. पण तिची संसारावरील आसक्ती कमी होवून परमार्थीक वृत्ती वाढत गेली. घरची गरीबी, शिक्षणाचा अभाव, तरीही समाधानी वृत्ती व संतवृत्तीला साजेशी पाण्डुरंगाची ओढ मनात होतीच. अखंड नामस्मरण चालू असे. शेतात काम करित असतानाही हा भक्तिभाव अभंगाचे रूपाने तिच्या मुखातून बाहेर पडे.

पुढे कोल्हापूर वास्तव्यात जयराम स्वामीच्या कथा कीर्तनाने संत बहिणाबाईच्या मनावर प्रभाव पडला. ती रोज तुकोबाचे अभंग म्हणू लागली व तुकोबाचे दर्शनाचा ध्यास घेतला. तिला तुकोबारायाना सदगुरू करून त्यांचे अनुग्रह व आर्शिवाद घ्यावयाचा होता. म्हणून रात्रंदिवस तुकोबाचे अभंग म्हणत त्यांचे ध्यान करू लागली शेवटी कार्तिक व. ५ शके १५६९

रोजी तुकोबारायानी स्वप्नात येवून गुरूपदेश दिला. बहिणाबाईचे सारे जीवन गुरूबोधामुळे बदलून गेले. तिनें आपले गुरु संत तुकाराम महाराज व त्यांचीहि गुरुपरंपरा आपल्या अभंगांत वर्णन केली आहे.

त्यांचे वर्णन करताना गेल्या शतकातील एक श्रेष्ठ सन्त, सन्तचरित्रकार आणि 'श्री गजानन विजय'कर्ते सन्तकवी दासगणू महाराज लिहितात ..

पहा केवढा अधिकार ..

ऋणि तिचा परमेश्वर ...

या साध्वीची समाधी 'शेऊर' या गावी आहे.

चमत्कार

असे सांगतात की त्यांना त्यांच्या पूर्वीच्या तेरा जन्मांचे स्मरण होते. या साध्वीच्या चरित्रातील एक प्रसंग ज्ञात आहे तो असा: नेमाप्रमाणे एकादशीच्या वारीकरिता पंढरीला निघालेल्या असताना त्याना अचानक थंडी वाजून ताप भरला.परंतू पाण्डुरंगाच्या भेटीची केवढी तळमळ, की त्यानी अंगावरच्या फाटक्या घोंगडीला विनंती केली, " ही माझी हुडहुडी तात्पुरती तुझ्याजवळ ठेव. एवढी वारी करून येईन आणि मग माझा भोग भोगिन." ही घोंगडी त्यानी एका झाडावर ठेवली व त्या वारीस निघून गेल्या. त्या सुखरूप परत येईपर्यन्त ते झाड हीव भरल्यामुळे थड्थड हालत होते.

http://mr.wikipedia.org/wiki/%E0%A4%AC%E0%A4%B9%E0%A4%BF%E0%A4%A3%E0%A4%BE%E0%A4%AC%E0%A4%BE%E0%A4%88_%E0%A4%AA%E0%A4%BE%E0%A4%A0%E0%A4%95_(%E0%A4%B8%E0%A4%82%E0%A4%A4)

# Bahinabai

Wikipedia

Bahinabai (1628–1700 AD) or Bahina or Bahini is a Varkari female-saint from Maharashtra, India. She is considered as a disciple of another Varkari poet-saint Tukaram. Having been born in a brahmin family, Bahinabai was married to a widower at a tender age and spent most of her childhood wandering around Maharashtra along with her family. She describes, in her autobiography Atmamanivedana, her spiritual experiences with a calf and visions of the Varkari's patron deity Vithoba and Tukaram. She reports being subjected to verbal and physical abuse by her husband, who despised her spiritual inclination but who finally accepted her chosen path of devotion (bhakti). Unlike most female-saints who never married or renounced their married life for God, Bahinabai remained married her entire life.

Bahinabai's abhanga compositions, written in Marathi, focus on her troubled marital life and the regret being born a woman. Bahinabai was always torn between her duties to her husband and her devotion to Vithoba. Her poetry mirrors her compromise between her devotion to her husband and God.

Early life

Bahinabai has written an autobiographical work called Atmamanivedana or Bahinibai Gatha, where she describes not only her current birth but also twelve previous births. The first 78 verses of the total 473 trace her current life.

As per the account, she was born in Deogaon(Rangari) or Devgaon(R) near Ellora or Verul in northern Maharashtra, where she spent her childhood. Her parents, Aaudev Kulkarni and Janaki were brahmins, the Hindu priest class, and considered their first child Bahinabai as a harbinger of good fortune. Bahinabai started reciting the names of God from an early age, while playing with her mates.

Bahinabai was married at the age of three with a thirty-year-old widower called Gangadhar Pathak, who she describes as a scholar and "an excellent jewel of a man", but stayed with parents until she reached puberty as per the custom. When Bahinabai was about nine years old, she with her parents and husband, had to leave Devghar due to a family dispute. They wandered with pilgrims along the banks of river Godavari and begged for grain, as customarily wandering holy men do. They visited Pandharpur, the city which hosts the chief temple of Vithoba, in this period. By the age of eleven, she with her family finally settled in Kolhapur. She was "subjected to the demands of married life" at this age, but she was not into it.

Later life

Bahinabai reported visions of the Varkari's patron deity Vithoba, pictured

In Kolhapur, Bahinabai was exposed to Hari-Kirtana songs and tales from the scripture Bhagavata Purana. Here, Bahinabai's husband was gifted a cow, who soon gave birth to a calf. Bahinabai reports a spiritual encounter with the calf. The calf, in Varkari literature, symbolizes a person who has attained the highest state of yogic concentration in the previous birth, but due to some fault, is forced to take birth as a calf. The calf followed Bahinabai wherever she went. Bahinabai with the calf also attended the Kirtana of the famed swami Jayaram. Jayaram patted heads of the calf and Bahinabai. When Bahinabai's husband heard of the incident, he dragged Bahinabai by her hair, beat and tied her up in the house. Following this, the calf and the cow gave up food and water leading to the former's death. At its burial, Bahinabai fainted and lay unconscious for days. She awoke with her first vision of the Varkari's patron deity Vithoba and later of her contemporary poet-saint Tukaram. Following the incident, she had another vision of the duo that revived her from the sorrow of the calf's death. In these visions, Tukaram fed her nectar and taught her the mantra "Rama-Krishna-Hari".Thereafter, Bahinabai pronounced Tukaram as her guru.[7] In her visions, Tukaram initiated her into the path of bhakti (devotion) and instructed her to recite the name of Vithoba. Some people considered her behaviour as a sign of madness, while others considered it a mark of sainthood.

Bahinabai's husband dissuaded her by saying that she being of a Brahmin, should not listen to the lower caste Shudra Tukaram. However, Bahinabai did not find happiness in the life of a dutiful wife and turns to bhakti, at the same time serving her husband. As her fame spread, her husband is portrayed to have been jealous of the attention Bahinabai received. Her hot-tempered husband is reported to have abused, beaten and confined Bahinabai to the cattle-shed. When all methods fail to deter her, he decided to leave Bahinabai, who was

three months pregnant at the time. However, he could not do so as he suffered a burning limbs sensation lasting a month, on the day of departure. Finally, he repented and was convinced of Bahinabai's faith and devotion to God. At the same time, Bahinabai realized her neglect of her husband and decided "serving him was more important than devoting herself to (another) god." Bahinabai writes:

> I'll serve my husband - he's my god ...
>
> My husband's my guru; my husband's my way this
>
> is my heart's true resolve.
>
> If my husband goes off, renouncing the world,
>
> Pandurang (Vithoba), what good will it do me to live among men? ...
>
> My husband's the soul; I'm the body ...
>
> My husband's the water; I'm a fish in it.
>
> How can I survive? ...
>
> Why should the stone god Vitthal (Vithoba)
>
> and the dream saint Tuka (Tukaram)
>
> deprive me of the happiness I know?

The family of Bahinabai went to Dehu, the home-town of Tukaram and paid their respects to him. Here, the brahmin Bahinabai's acceptance of the lower caste Sudra Tukaram as her guru, agitated local brahmins, which led to harassment of the family and threatening of ostracism. In Dehu, Bahinabai gave birth to a daughter, who she named Kasibai. But, she was distressed and mediated suicide. Tukaram in her vision, stopped her and blessed her with poetic powers and prophesied that she would have a son who was a companion in her previous birth, thus Bahinabai is believed to have started composition of poetry, the first of which were dedicated to Vithoba. Consequently, she had a son, who she named Vithoba, the exact time of his birth is not provided, but he is mentioned in a later part of her autobiography.

Finally the family moved to Shirur, where Bahinabai practised a vow of silence for a while. In 1649, on Tukaram's death, Bahinabai revisited Dehu and fasted for eighteen days where, according to the traditional account, she was blessed with a vision of Tukaram again.

She then visited the saint Ramdas and stayed in his company until his death in 1681. Afterwards she returned to Shirur.

In last sections of her autobiography, Bahinabai says she has "seen her death".She prophesied her death and wrote a letter to Vithoba, her son, who had gone to Shukeshwar to perform last rites of his wife. On her death-bed, Bahinabai told Vithoba (her son) that he had been her son throughout her twelve previous births and also in her current (thirteenth) birth, which she believed was her last. Further, she narrated the tale of her twelve previous births, which are recorded in her autobiography. She died in 1700, at the age of 72.

Literary works

Apart from her autobiography, Bahinabai composed abhangas, which deal with various subjects like praise of god Vithoba, Atman, Sad-guru, sainthood, Brahmanhood, and devotion. Bahinabai's abhanga compositions also focus on her troubled relationship with her husband, the conflict between husband and wife, and to certain extent its resolution. She even portrays her husband's hostile and harmful feelings with empathy. Unlike many of the woman-saints of the period, Bahinabai remained married her entire life, dutifully serving her husband, balancing her roles pativrata (a devoted wife) and virata (the detached). Bahinabai does not revolt against social traditions and believed denouncement of the world is not the solution to a woman's suffering. Her poetry reflects her compromise between her devotion to her husband and her god Vithoba.

Bahinabai also comments on the duties of a married woman. Some abhangas extol the merits of a pativrata, others advocate pure devotion to God which may lead to the ire of society. Others advocate the compromise. She also speaks of pravrtti (action) and nivrtti (quiescence), personified as wives of manas (the mind). Both of them argue over their own superiority, winning a particular moment in the debate and finally reconciling and together directing the mind to its ultimate goal. In her own life, Bahinabai sought to balance these two: pravrtti - the duties of a virtuous wife and nivrtti - renunciation of the world.

Bahinabai sometimes curses his fate of being born as a woman, which author Tharu interprets as "her scepticism, her rebelliousness and her insistent refusal to abandon her aspiration for the truth". She regrets her female birth as she was kept away from the knowledge of the holy scriptures like Vedas and sacred mantras, by the male-dominated brahmin society. Bahinabai sings in her abhanga:

The Vedas cry aloud, the Puranas shout

"No good may come to woman."

I was born with a woman's body

How am I to attain Truth?

"They are foolish, seductive and deceptive -

Any connection with a woman is disastrous."

Bahina says, "If a woman's body is so harmful,

How in this world will I reach Truth?"

At times, Bahinabai's abhangas call out to her god Vithoba (Panduranga, Hari) to help her to balance her twin roles. Bahinabai's wisdom can be summed up in her words as: "A woman's body is a body controlled by somebody else. Therefore the path of renunciation is not open to her." Bahinabai's philosophy reveals the social status of the seventeenth century Indian woman, who was supposed to no existence apart from her husband.

She has also composed a text called Pundalika-Mahatmya, which details the legend of Vithoba and devotee Pundalik, a central figure in Varkari tradition.

# क्रांतिकारी संत बहिणाबाई

शामसुंदर सोन्नर
दैनिक प्रहार : सुखदा
October 3, 2013

भारतीय समाजमनावर वर्णव्यवस्थेची आणि स्त्री-पुरुष भेदभावाची मगरमिठी घट्ट होती, अशा कालखंडात संत बहिणाबाई पाठक यांनी केलेले धाडस खऱ्या अर्थाने क्रांतिकारी म्हणायला पाहिजे. खरे तर तमाम स्त्रियांच्या मनात खदखदणाऱ्या आक्रंदनाला त्यांनी आपल्या कृतीतून वाट करून दिली. ब्राह्मण कुळात जन्मलेल्या बहिणाबाईंनी त्या काळी क्षुद्र समजल्या जाणाऱ्या कुणबी तुकारामांचा अनुग्रह स्वीकारावा हे केवढे धाडस! पतीचा विरोध झुगारून न देता त्यालाही आपल्या भक्तीच्या वाटेवर चालण्यास भाग पाडणारी त्यांची परिपक्वता खऱ्या अर्थाने अधिक ठळकपणे प्रतिबिंबित होते. त्या बहिणाबाईंच्या क्रांतिकारी व्यक्तिमत्त्वाचा घेतलेला धांडोळा..

वर्णव्यवस्थेच्या घट्ट मगरमिठीत अडकलेल्या समाजाला मुक्त करण्यासाठी संत नामदेव आणि ज्ञानदेवांच्या पुढाकाराने वारकरी संप्रदायाची वाट अधिक विस्तीर्ण झाली. स्त्री-शूद्रांना वेदाने नाकारलेला अधिकार मिळवून देण्याचे धाडसी पाऊल वारकरी संप्रदायाने उचलले. अर्थात, ही वाटचाल करणाऱ्यांमध्ये वर्णव्यवस्थेचे चटके बसलेल्यांचा अधिक भरणा असला तरी समाजाच्या सर्व घटकांचा त्यात समावेश होता. म्हणजे चोखोबांसारखा गावकुसाबाहेर वाढलेला संतकवी जितक्या अधिकाराने वारकरी संप्रदायात वावरत होता, तितक्याच अधिकाराने देवळाच्या गाभाऱ्यात पूजापाठ करणारे ब्राह्मण कुळातील परिसा भागवत वारकरी संप्रदायाशी एकरूप झाले होते. कदाचित हाच भेदाभेद भ्रम गाडून टाकणारा विचार संत बहिणाबाईंना भावला असावा म्हणूनच त्यांनी त्या काळाची समाज व्यवस्थेची कुंपणं तोडून समतेचा जागर घालणाऱ्या वारकरी संप्रदायात सहभागी होण्याचा निर्धार केला असावा.

वेदांनी स्त्री-शूद्रादिकांना वेद अध्ययनाचा अधिकार नाकारला होता. मात्र शूद्र म्हणून गणल्या गेलेल्या तुकारामांना बोचणारी ही जाणीव त्यांनी आपल्या अनेक अभंगांतून मांडली.

इतकेच नव्हे तर जे वेद अध्ययनाचा अधिकार सांगतात त्यांना खडसावताना सांगितले, तुम्ही वेदांचे पूजन केले असेल, पाठांतर केले असेल, मात्र त्याचा खरा अर्थ जर कुणाला कळला असेल तर तो फक्त आम्हीच जाणलेला आहे-

वेदाचा तो अर्थ आम्हाशीच ठावा।

येरानी वाहवा भार माथा॥

कदाचित ही सल बहिणाबाईंच्याही मनात असावी. इतरांना जर वेदाचा अधिकार आहे, तर आपल्याला का नसावा. शूद्र तुकोबांनी तो अधिकार मिळवला असेल तर तेच स्त्रियांनाही तो अधिकार मिळवून देतील, या भावनेतून बहिणाबाई तुकाराम महाराजांच्या विचाराकडे आकर्षित झाल्या असाव्यात. ब्राह्मण कुळात जन्मलेल्या बहिणाबाईंच्या घरात भक्ती परंपरा पूर्वीपासूनच होतीच. वेद, उपनिषदे, भागवत कथा यांचे नित्य चिंतन त्यांना घडलेले होते. मात्र तुकोबांची अभंगवाणी जशी त्यांच्या कानी पडली, तशी त्यांना त्या विचारांचाच ध्यास लागला. अर्थात ब्राह्मण कुळात जन्मलेल्या पतीला त्यांची कुणबी तुकारामांवर असणारी निष्ठा सहज पचनी पडण्यासारखी नव्हती. म्हणून पतीविरोध त्यांनी झुगारून दिला नाही, तो सुरुवातीला सहन करत त्यांनी तुकोबांच्या अभंगांचे चिंतन सुरू ठेवले. हळूहळू पतीच्याही मनात तो आदर निर्माण केला आणि एके दिवशी तुकाराम महाराजांनी स्वप्नात बहिणाबाईंना अनुग्रह देऊन कवित्वाची आज्ञा दिली. योगायोग म्हणजे तुकाराम महाराज यांनाही नामदेव महाराजांनी स्वप्नामध्येच जाऊन कवित्वाची स्फूर्ती दिली होती. हे तुकारामांनीच एका ठिकाणी नमूद केलेले आहे. ते म्हणतात-

नामदेवे केले स्वप्ना माजी जागे।
सवे पांडुरंग येऊ निया॥
सांगितले काम करावे कवित्व।
वावूगे उत्तर बोलो नये।।

हीच परंपरा पुढे चालवत तुकाराम महाराजांनी बहिणाबाईंना कवित्व करण्याची आज्ञा केली, स्फूर्ती दिली. त्या काळी एका ब्राह्मण स्त्रीने कुणब्याचा अनुग्रह घ्यावा, हे खचितच समाजमनाला मानवणारे नव्हते. पतीने तर त्यांना एक वेळ तू तुकोबांचा अनुग्रह घेणारच असशील तर मी तुला टाकून देईल, अशी धमकीही दिली होती. मात्र पतीला झुगारून न देता,

त्याचे कौशल्याने मन वळवण्याचे काम बहिणाबाईंनी केले. पतीलाच परमेश्वराचा दर्जा देऊन त्यांनी त्याच्यावर असणारी आपली निष्ठा प्रकट केली. त्या म्हणतात-

भ्रताराची सेवा तोचि आम्हा देव।
भ्रतार स्वयमेव परब्रह्म॥

वारकरी विचारांचा हाच खरा गाभा आहे. समाजातल्या अनेक भक्कम व्यवस्थेला मोडून काढत असताना त्यांनी कुठेही विद्रोहाची भाषा न करता समन्वयाचा मार्ग स्वीकारल्याचे दिसते. समतेचा जागर मांडत असताना कुठे तरी आम्ही फार मोठे परिवर्तन घडवायला निघालो आहोत आणि अगोदरचे सर्वच उलथवून टाकणार आहोत, अशी आक्रस्ताळी भूमिका न घेता त्यांनी थेट कृतीतून आपला विचार पुढे नेला. नामदेव महाराजांनी चोखोबांना पांडुरंगाच्या मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून आंदोलने केली नाहीत. मोर्चे काढले नाहीत. जर मला भक्ताला देवाकडे नेता येत नसेल तर मग देवालाच भक्ताकडे घेऊन जाईन, अशी भूमिका घेतली. म्हणून नामदेवाने आपले पहिले कीर्तन पांडुरंगाच्या मंदिरात केले नाही, तर ते पंढरपूरच्या वाळवंटात केले. कारण त्या काळी समाजातल्या सर्वांनाच मंदिरामध्ये प्रवेश नव्हता. वाळवंटातील कीर्तनात मात्र सर्व जण सहभागी होऊ शकले. ज्यात दलित समाजातील चोखोबांपासून ते उच्च समजल्या जाणाऱ्या ब्राह्मण कुळातील परिसा भागवत यांचा समावेश होता. त्या बदलाचीच प्रक्रिया पुढे संक्रमित होऊन वर्णव्यवस्थेच्या गाठी काही प्रमाणात सैल झाल्याचे दिसते. बहिणाबाईंनीही त्यांच्या तुकारामभक्तीला विरोध होत असताना कुठेही विद्रोहाची भाषा केली नाही. मात्र आपल्या पतीसह सर्व नातेवाइकांचे मन वळवून त्यांनाही तुकारामभक्तीत सामील करून घेतले.

वारकरी विचाराचा झेंडा खांद्यावर घेऊन या परंपरेचा इतिहास आपल्या काव्यातून मांडणाऱ्या बहिणाबाईंचा जन्म औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील शिऊर येथे गोदावरीच्या पवित्र कुशीत झाला. त्यांच्या आईचे नाव जानकी होते, तर पित्याचे नाव आऊजी. त्यावेळच्या परंपरेप्रमाणे त्यांचा विवाह वयाच्या पाचव्या वर्षीच त्याच गावातील पाठक घराण्यात झाला. माहेरी आणि सासरी दोन्हीकडे भक्ती परंपरा असल्याने त्यांना लहानपणापासून भक्तीची गोडी होती. घरची परिस्थिती बेताचीच असली तरी वृत्ती समाधानी होती. मात्र पुढे परिस्थिती अधिकच खालावल्याने त्यांना आपले गाव सोडावे लागले. कोल्हापूर येथे वास्तव्यास जावे लागले. तेथे असताना जयराम स्वामी यांची कथा-कीर्तने ऐकण्याची संधी त्यांना मिळाली. त्यातून त्यांची भक्ती अधिकाधिक परिपक्व होत गेली. त्यावेळी मावळ प्रांतात तुकोबांनी भक्तीचा डांगोरा पिटला होता. त्यांची कीर्ती सर्वदूर पसरली होती. जयराम

स्वामी यांच्या कीर्तनातही तुकारामांच्या अभंगांचे अनेक संदर्भ येत. त्यात स्त्री-क्षुद्रांना वेदाचा अधिकार नाकारणाऱ्यांना तुकोबांनी खडसावले. त्याचा अर्थ आपल्यालाच केवळ ‘ठाऊक’ असल्याचे सांगितले. या विचारांचा बहिणाबाईंवर परिणाम झाला असावा. त्यातून त्यांनी तुकोबांची अनेक अभंग मुखोद्‌गत केले. त्यांच्या भेटीची ओढ मनात लागून राहिली. पतीला सांगितले तेव्हा त्याने सुरुवातीला दुर्लक्ष केले. तेव्हा तू तुकोबांच्या भेटीचा नाद सोड, नाही तर मी तुला सोडतो, अशी धमकी दिली. बहिणाबाईंनी पतीचीही आज्ञा मोडली नाही आणि तुकारामांवरील श्रद्धाही कमी होऊ दिली नाही. त्या ध्यासातूनच त्यांना तुकाराम महाराजांनी स्वप्नात अनुग्रह दिला. त्यानंतर पतीचे मन वळवून बहिणाबाईंनी तुकाराम महाराजांची देहू येथे जाऊन भेट घेतली. त्यांच्या सान्निध्यात दोघे पती-पत्नी काही काळ राहिले. तुकाराम महाराजांच्या विचारांचा आणि शब्दकळेचा प्रभाव बहिणाबाईंच्याही अभंगांत दिसून येतो. पुढे आपल्या सासरी गेल्यानंतर बहिणाबाईंनी आपली अभंग साधना सुरूच ठेवली. त्यांनी एकाच अभंगातून वारकरी संप्रदायाचा इतिहास मांडला आहे.

ज्ञानदेवे रचिला पाया।
उभारीले देवालया।। १॥
नामा तयाचा किंकर।
तेणे केला हा विस्तार॥ २॥
जनार्दन एकनाथ।
खांब दिला भागवत॥ ३॥
तुका झालेसे कळस।
भजन करा सावकास॥ ४॥
बहिणी म्हणे फडकती ध्वजा।
निरुपण केले ओजा॥ ५॥

असा समतेचा जागर मांडत डोळस भक्तीचा डांगोरा पिटणाऱ्या तुकारामांच्या परंपरेशी बहिणाबाईंची असलेली नाळ कायम राहिली. पुढे त्या आपल्या शिऊर गावी गेल्यानंतर त्यांनी आपली अभंगरचना सुरूच ठेवली. तुकाराम महाराजांच्या विचारांशी असणारा एकनिष्ठ भाव लक्षात घेऊनच देहू गावात बहिणाबाईंच्याही मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. शिऊर गावातही त्यांचे भव्य मंदिर आहे. हे मंदिरच स्त्रियांना खऱ्या भक्तीची वाट दाखवत राहील.

# वारकरी ध्वजा- बहिणाबाई

श्रीरंग गायकवाड

जातीपातींची बंधनं तोडून वारकरी पंथाची ध्वजा फडकावण्याचं महान काम केलं, संत बहिणाबाईनं. ब्राम्हण जातीतल्या बहिणाबाईनं कुणबी समाजातल्या तुकोबारायांचं शिष्यत्व पत्करलं. आणि संतसाहित्यात मोलाची भर घातली.

'ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस' ही वारकरी सांप्रदायाची रचना सांगितली ती संत बहिणाबाईंनी. वारकरी पंथाचं तत्वज्ञान सांगणाऱ्या बहिणाबाईंचा जन्म औरंगाबादमधील देवगावचा. वयाच्या तिसऱ्याच वर्षी त्यांचं लग्न झालं, एका ३० वर्षांच्या बीजवराशी.

बहिणाबाईंचे पती मराठवाड्यातल्या शिऊर गावचे कर्मठ ब्राम्हण. लहानग्या बहिणाबाईला या नवऱ्याचा जाच होऊ लागला. बहिणाबाईंनी आईवडील आणि नवऱ्यासोबत गाव सोडलं. कोल्हापूरला एका बहिरंभट नावाच्या ब्राम्हणाच्या घरात त्यांना आश्रय मिळाला. इथंच त्यांना अध्यात्माची गोडी लागली.

तुकोबारायांचा दृष्टांत

एका लहान प्रसंगाने बहिणाबाई तुकोबारायांशी जोडल्या गेल्या. बहिरंभटाच्या घरी त्यांच्या एका गायवासरावर जीव जडला. यातील वासराचा मृत्यू झाल्याने दु:खाने बहिणाबाई बेशुद्ध पडल्या. या अवस्थेतच त्यांना तुकोबारायांचा दृष्टांत झाला.

तुकोबारायांच्या भेटीची ओढ लागलेल्या बहिणाबाईंना तुकोबारायांनी दृष्टांत देऊन 'रामकृष्ण हरी' हा मंत्र दिला. तुकोबारायांचा ध्यास घेतलेल्या बहिणाबाईंच्या नवऱ्याचं मनही नंतर पालटलं. आणि ते दोघेही देहूला पोहोचले. देहूत त्यांना तुकाराममहाराजांचं मार्गदर्शन मिळालं. आणि तुकोबारायांप्रमाणंच त्यांनी आयुष्यभर संसारात राहून परमार्थ केला.

शिऊरमध्ये अभंगलेखन

तुकोबारायांचे मार्गदर्शन घेऊन बहिणाबाई आपल्या सासरी म्हणजेच औरंगाबाद जिल्ह्यातल्या शिऊर इथं परतल्या. इथंच बहिणाबाईंनी विपुल अभंग लिहिले.

बहिणाबाईचे असे अनेक अभंग वारकरी गातात. पदे, आरत्या, हमामा, पाळणा, पिंगा, झिंपा, सौरी, डोहो अशी विविध प्रकारची रचना बहिणाबाईंनी केली. त्यात काही हिंदी रचनाही आहेत.

तुकोबारायांप्रमाणे या अभंगांतून बहिणाबाईंच्या शब्दांना धार चढते. भोंदू संत, भ्रष्ट ब्राम्हण, अनिती, दुराचार व्यसने यांवर बहिणाबाई कोरडे ओढतात.

आपल्या अभंगातून बहिणाबाईंनी क्रांतीकारक विचार मांडले. बौद्धतत्त्वचिंतक अश्वघोष यांनी लिहिलेल्या ब्राम्हण्यविध्वंसक 'वज्रसूचि'वर बहिणाबाईंनी अभंगात्मक भाष्य केलं. ही वज्रसूचि जन्माधिष्ठीत ब्राम्हण्याला विरोध करते. वारकरी पंथाने सांगितलेला समतेचा विचार बहिणाबाईंनी खऱ्या अर्थाने उंच नेला.

शिऊरमध्ये भव्य मंदिर

संत बहिणाबाईचे अभंग तर अमर झाले आहेतच, पण तिच्या आठवणीही वारकऱ्यांनी जपून ठेवल्यात. शिऊरमध्ये तिचे भव्य मंदिर उभारण्यात आलंय, तर देहूत बहिणाबाईंच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आलीय.

इथं बहिणाबाईची समाधीही आहे. तुकारामांची रांगडी भाषा बोलणाऱ्या बहिणाबाई मूळच्या औरंगाबादमधील वैजापुरातल्या शिऊर गावातल्या. गावच्या या थोर लेकीचं गावकऱ्यांनी भव्य मंदीर बांधलंय. इथं नियमितपणे भजन कीर्तनाचे कार्यक्रम होतात.

मंदिराच्या भिंतीवर संगमरवरी दगडांवर बहिणाबाईंचे अभंग कोरण्यात आलेत. महिला भाविकांची मंदिरात सतत वर्दळ असते.

देहूत बहिणाबाईंची मूर्ती

बहिणाबाईंची अशीच आठवण जपलीय ती संत तुकोबारायांच्या देहू नगरीनं. इथं बहिणाबाईंच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आलीय.

बहिणाबाईंची ही स्मारकं माणुसकी शिकवणारी तसंच सर्वांना सर्व धर्म समभावाची प्रेरणा देणारी ठरली आहेत.

http://shreerangngaikwad.blogspot.in/2011/07/blog-post_267.html



# बहिणाबाई

- माधवी कुंटे

Maharashtra Times :

Jul 3, 2009,

कान्होपात्रेखेरीज विठ्ठलाला संपूर्ण समपिर्त झालेली ठळक स्त्रीसंत म्हणजे बहिणाबाई! बहिणाबाईने स्वत: थोडक्यात आपलं ओवीबद्ध आत्मवृत्त लिहिलं आहे. त्यामुळे त्यांचं जीवन समजून घेणं अधिक सुलभ होतं. बहिणाबाईंचा जन्म शके १५५० मध्ये झाला आणि शके १६२२ मध्ये त्या समाधिस्थ झाल्या. वेरूळच्या पश्चिमेस असलेलं देवगाव हे त्यांचं जन्मग्राम. देवगावाचं फार सुंदर वर्णन बहिणाबाईने केलं आहे. गावाच्या पश्चिमेस शिवनदी वाहते आणि त्या तीर्थनजीकच्या लक्षाग्रामात लक्षतिर्थे वास करतात, असं त्यांनी म्हटलं आहे. अशा पावन स्थळी आऊजी आणि जानकी कुळकर्णी यांच्या पोटी त्यांचा जन्म झाला. बहिणाबाई नवसाने झाल्या. असं म्हटलं जातं की बारशाच्या उत्सवानंतर आऊदेव अरण्यात गेले, तेव्हा वेरुळच्या वाटेवर पीतांबराच्या गाठीत बांधलेली मोहर सापडली. या शुभशकुनानंतर ज्योतिषानेही सांगितलं की, या मुलीमुळे तुमचं कल्याण होईल. पाच वर्षांच्या बहिणाबाईंचं तीस वर्षांच्या विधुर रत्नाकर पाठक यांच्याशी लग्न लावून दिलं. रत्नाकर शिरूर इथे ज्योतिषी होते. नंतर त्यांच्या वडिलांचं कुळकर्णीपण धोक्यात आल्यावर त्यांनी जावई आणि लेकीस बोलावून घेतलं. सगळे मिळून देवदर्शन करत भीमातीरी आले. पंढरीला येताच बहिणाबाईला वाटलं तिथेच राहावं. पण पुढे शंकरदर्शन करून मंडळी शिंगणापुरला आली. यावेळी बहिणाबाई नऊ वर्षांच्या होत्या. नंतर सर्वांनी रहिमतपुरला मुक्काम केला. त्या अकरा वर्षांच्या झाल्या आणि त्यांना संतपदाची तीव्र ओढ लागली. योगयोगाने मंडळी कोल्हापुरला आली. बहिरंभट या ब्राह्मणाकडे बिऱ्हाड करून राहिले.

इथे बहिणाबाईंच्या आयुष्याला मोठी कलाटणी मिळाली. बहिरंभटाला एक सवत्स धेनू मिळाली. त्याला स्वप्नात दृष्टांत झाला की तुझ्या ओसरीत ब्राह्मण कुटुंब आहे, त्यांना गाय दे. त्यानुसार गायीची सेवा करण्याची जबाबदारी बहिणाबाईंकडे आली. गाईचं वासरू

सदासर्वकाळ त्यांच्या बरोबर राही. बाईंचा जीव त्याच्यात फार गुंतला. त्याच सुमारास कोल्हापुरास जयरामस्वामी वडगांवकर आले. बाई त्यांचं कीर्तन ऐकण्यास जात. तेव्हा वासरूही त्यांच्यासोबत जाई. बाईंच्या जवळ उभे राही. पुढे मोरोपंत नावाच्या गृहस्थाघरी कीर्तन होतं. तिथेही ते वासरू गेलं. लोकांनी त्याला हाकलल्यावर वासरू हंबरू लागलं. ते ऐकून बाई रडू लागल्या. तेव्हा जयरामस्वामींनी स्वत: वासरास तिथे आणलं. बहिणाबाईंनी जयरामस्वामींच्या चरणी लोटांगण घालताच वासरानेही तसंच केलं. हे सर्व घडल्यावर मंडळी घरी आली.

पहाटे मीराबाई नावाच्या बाईने हा प्रकार बहिणाबाईंच्या नवऱ्याच्या कानावर घातला. त्यामुळे नवऱ्याला प्रचंड संताप आला. त्याने बाईंना बेदम मारलं. नंतर आईवडिलांनी विचारलं की तिने असा कोणता अपराध केला? तेव्हा तर त्याने तिला मोटेस बांधलं. हे सगळं बघून बहिरंभटांनाच असह्य झालं. त्याने सर्वांनाच घराबाहेर काढलं. सर्वांनी त्याच्याकडे एक दिवस आसऱ्याची विनंती केली. त्या दिवशी गाय आणि वासरू यांनी अन्नपाणी वर्ज्य केलं. तेव्हा बहिणाबाईंनीही अन्नपाणी वर्ज्य केलं. तिथे स्वत: जयरामस्वामी आले. त्यांनी गाय, वासरू आणि बहिणाबाईंच्या पूर्वजन्मीचे वृत्त सांगितलं. द्वादशीला वासरू मरणासन्न असताना बहिरंभटाने म्हटलेल्या श्लोकाचा उत्तरार्ध वासराने सहज मनुष्यवाणीत म्हटला. नंतर वासरू मृत झालं. बहिणाबाई बेशुद्ध पडल्या. लोकांनी त्या वासराची अंत्ययात्रा काढून समाधी दिली. बहिणाबाई तीन दिवस बेशुद्ध होत्या. चौथ्या दिवशी मध्यरात्री एक ब्राह्मण त्यांच्या स्वप्नात येऊन म्हणाला - 'बाई सावध व्हा' बाई जाग्या झाल्या आणि त्यांच्याच शब्दात सांगायचं झालं तर,

तेथुनियां मन करूनी सावध ।

स्मरणी स्वत:सिद्ध चित्त केले

बहेणी म्हणे देह सर्वही विकळ ।

परिते निश्चळ चित्त माझे

उघडोनिया नेत्र पाहें जावे पुढे ।

तंव दृष्टीपुढे पांडुरंग

बाईंना डोळ्यासमोर पंढरपूर दिसलं. तुकारामाचे अभंग त्या म्हणू लागल्या. तुकारामच्या दर्शनाची उत्कंठा लागली. लहान वयात पराकाष्ठेचा छळ, वासराचा चमत्कार आणि त्याचा मृत्यू त्यानंतर त्यांच्या आयुष्याला हे वळण मिळालं. गुरू कोण ते कळलं. पुढील आयुष्याची वाट लख्ख दिसली. बाई तुकारामबुवांच्या भेटीसाठी तळमळू लागल्या.

बहेणी म्हणे माझा जाऊ पाहे जीव । कां बा नये कींव तुकोबा रे, अशी अवस्था झाली. तुकाराम बुवांनी त्यांना स्वप्नात येऊन दर्शन दिलं. गुरूकृपा झाल्याचा आनंद बहिणाबाईंना झाला. त्यांना वासराच्या मृत्यूनंतर आठवड्याच्या आत या गोष्टी घडल्या. हे ऐकून खुद्द जयरामस्वामी बाईंना भेटायला आले. बाईंनी स्वामींची मनातल्या मनात पूजा केली. पुढे स्वामींना आणि बाईंनाही तुकारामबुवांनी मनोमय दर्शन दिलं आणि आता आत्मज्ञानबोधाच्या मार्गाला लागा, असं सांगितलं. हे सर्व कळल्यावर लोकांच्या झुंडी बाईंना भेटायला येऊ लागल्या. बाईंच्या नवऱ्याला, शुद्र तुकारामाने बायकोला स्वप्नात दर्शन दिल्याचा खूप संताप आला. ती बिघडली आहे, असं कारण देऊन त्याने तिचा त्याग करण्याचं ठरवलं. बाईंना त्याने निर्दयतेने मारलं, झोडलं, छळ केला. पण बाईंच्या मनात जराही राग नव्हता.

यानंतर तो खूप आजारी पडला. बाईंनी अपार सेवा करून त्याला जीवावरच्या आजारातून वाचवलं. त्याची अंत:करणशुद्धी झाली. सर्वजण देहूला गेले. तुकारामबुवांचं दर्शन घेतलं. मंबाजीने त्यांना आग्रह केला की त्या सर्वांनी त्याचं शिष्यत्व घ्यावं. या मंडळींनी नकार दिला तेव्हा त्याने त्यांचा खूप छळ केला. त्यांच्या गायीला मारलं. त्या माराचे वळ तुकोबाच्या पाठीवर उमटले असं म्हटलं जातं. तुकोबाचे शिष्यत्व पत्करल्यावर बाईंची अध्यात्मिक प्रगती होऊ लागली. त्या म्हणू लागल्या -

प्रपंच असत्य कळो आले ज्या । विषय हे तया नावडता।।

ब्राह्मण्याविषयी त्यांचे विचार स्पष्ट होते, त्यांनी म्हटलं आहे की,

जरामृत्युभय सर्वांसी समान ।

तरी तें ब्राह्माण कंवी म्हणों ।।

या लागी विवेक धरून मानसी ।

ब्राह्माण पदासी ओळखावे ।।

दिवसेंदिवस त्या विठ्ठलभक्तीत मुरत गेल्या. सर्व जीवमात्रांत विठ्ठल असल्याचा प्रत्यय येऊ लागला. विठ्ठलाविण काहीच अस्तित्वात नाही हे अनुभवास आले. त्या म्हणू लागल्या -

आम्ही तो निहेर्त साक्ष ऐसी येत ।

भोगा माजी चित्त क्षण नाही ।।

आता मना तुझे येथे काय चाले ।

निहेर्त पाऊलें विठ्ठलाचीं ।।

मनात पाहिलें बुद्धीत गाईलें ।

चित्तांत ध्याइलें विठ्ठलासी ।।

वासना गाळिली सर्वही चाळीली ।

शांति स्थिरावली विठ्ठलीं हे ।।

काम, क्रोध, लोभ मत्सराचे अंग ।

झाला पांडुरंग आपणाचे ।।

बहेणी म्हणे मना हेतूचा उगाणा ।

करूनी निर्वाणा पाहतसे ।।

वयाच्या पाचव्या वर्षांपासून बाईंचा ओढा परमार्थाकडे होता. ते पूर्वजन्म संचित असावं असं म्हटलं जातं. गुरू संत तुकारामबुवा, त्यांच्याप्रमाणे बहिणाबाईंनाही संतांचा सहवास आवडे. पण संत कोण याबद्दल त्यांचं मत अर्थात तुकाराम महाराजांच्या विचार मुशीतून तयार झालेलं होतं.

दुसरियाचे दु:खे शिणे ज्याचे चित्र ।

तोचि एक संत ओळखावा ।।

पांडुरंगाच्या पायी चित्त एकाग्र झाल्यावर त्याचे जे सुंदर वर्णन बाईंनी अभंगात केले आहे ते अस्सल भक्तीतून उमटलेलं आहे. बहिणाबाई म्हणतात -

माझी दीनानाथ दीनबंधु हरि ।

नांद भीमातीरी पंढरिये ॥

विटे नीट उभा समचरण साजिरीं ।

पाऊलें गोजिरी सुकुमार ॥

वैजयंती माळा रूळतसे गळां ।

कांसेसी पिंवळा पीतांबर ॥

भाळी ऊर्ध्व पुंडू कुंठले गोमटी ।

चंदनाची उटी सर्वांगासी ॥

शिरी टोप साजे रत्नाचा साजिरा ।

काढियेला तुरा मोतियांचा ॥

जैशा हिऱ्यांच्या शोभती दंतपंक्ति ।

बहेणी म्हणे ध्याती हृदयासी ॥

विठोबाच्या भक्तीत तल्लीन झाल्यावर बहिणाबाई म्हणू लागल्या-

भक्ती प्रेम सुख न कळे आणिकां ।

पंडितां वाचकां वैदिकासी ।।

विठ्ठलापायी बुद्धी एकाग्र झाल्यावर बुद्धीपलीकडे असलेल्या प्रज्ञेच्या प्रदेशात बहिणाबाई सहज पोहोचल्या असाव्या. गीतेचं तत्वज्ञान त्यांनी सहज सोप्या शब्दात ठिकठिकाणी उलगडलेेलं दिसतं.

सूर्याचिये अंगी भासले मृगजळ ।

सूर्य तो केवळ नेणे तया

तैसी जाण माया ब्रह्माींच आभासे।

परी स्पर्श नसे ब्रह्मात्वासी ।।

त्यांचं अध्यात्म ज्ञान वाढत गेलं. त्या जोडीला विठ्ठलभक्ती रोमरोमात होती. विठ्ठलनाम श्वासागणिक उच्चारले जात होते. आपला हा जन्म अखेरचा असल्याचं त्यांना समजलं होतं. या आधीच्या तेरा जन्मांचं स्पष्ट ज्ञान त्यांना होतं.

देहू इथे असताना एकदा तीन रात्र बाई इंदायणीतीरी एकांतात बसलेल्या होत्या. तिथे तिसऱ्या दिवशी तुकाराम महाराज त्यांना तीन सोपे मंत्र सांगून म्हणाले की, हा तुझा तेरावा जन्म. अखेरचा! तुझ्या पूर्व योगसाधनेमुळे आता मुक्ती समीप आली आहे. तुझ्या उदरी पुत्र आहे. तो तुझा तेरा जन्मांचा सोबती आहे. तोही आत्मनिष्ठ ज्ञानी असेल. तुला कवित्वशक्ती दिली आहे. तुझी बुद्धी आत्मज्ञानात स्थिर राहील. इतके बोलून बाईंच्या भिवयांच्यामध्ये स्पर्श करून तुकाराबुवा गुप्त झाले.

नंतर बाईंनी इंदायणीत स्नान करून विठ्ठल दर्शन घेतले. पाच पदे आणि एक आरती रचून विठ्ठलाला समपिर्त केली. त्यानंतर अखेरच्या श्वासापर्यंत त्या उत्कृष्ट भक्ती, अध्यात्मपर अभंग रचना करत राहिल्या. त्यांचा मुलगा विठोबा आपल्या पत्नीच्या अंत्यविधीनंतर गावी

गेला होता. त्यास बाईंनी बोलावलं. वयाची बाहत्तर वर्षे उलटली होती. आजपासून पाच दिवसांनी आपण देह ठेवणार असल्याचं सांगितलं. त्या वायुनिरोधन करून मृत्यूकालची वाट बघत होत्या. त्यांनी आपल्या तेरा गतजन्मांची हकीगत आपल्या मुलाला सांगितली. अखेरचे अभंग सांगून बाई समाधिस्थ झाल्या.

आपले आपण देखिले मरण ।
तो झाला शकुन खानदेशी
उभारिली गुढी मनाच्या शेवटी ।
झाली मज भेटी आत्मारामी
केला प्राणायाम सोहं धारणेशी ।
मिळाली ज्योतीसीज्योत नेणे
सरले संचित आयुष्य देहाचे।
क्रियामाण अंतीचे रामरूप

अशी आपल्या अंतकाळची स्थिती खुद्द बहिणाबाईंनी वर्णन केली आहे. आता आपल्याला पुनर्जन्म नाही. याबद्दल त्यांच्या मनात काहीही संदेह नव्हता. बहिणाबाई थोडेबहुत शिकलेल्या होत्या. लोक त्यांना मान देत. पण त्यांना कसलाच अहंकार नव्हता. राग लोभही निमाले होते. विठ्ठल भक्तीतून अध्यात्मज्ञानापर्यंत पोहोचलेली थोर स्त्रीसंत म्हणून बहिणाबाईंचं स्थान अढळ आहे. त्यांच्या प्रासादिक साध्या सोप्या अभंग रचनेने त्यांची शिकवण आजही लोकमानसात दृढ आहे.

http://maharashtratimes.indiatimes.com/articleshow/4730929.cms

# Sant Bahinabai

Bahinabai was not just a poetess, she was a devout worshipper of Lord Vithoba of Pandharpur. She was born to Audeo Kulkarni and Jankibai in 1628 A.D. at a town named Deogaon, to the west of Verula, a place well known for its carved temples. Her father, Audeo Kulkarni was a Yajurvedi Brahman and village scribe. A childless couple, Bahinabai was born to them after much penance and austerities. After the birth of Bahinabai, they were also blessed with two sons.

When Bahina was five years old, her parents married her off to a very learned businessman in Shivpur called Ratnakar Pathak, a widower aged thirty. After Bahina's marriage, her father Audeo due to family feuds fell into debts and was imprisoned. The son-in-law Ratnakar helped to set him free and the whole family set off to Rahimatpur. After staying there for two years they finally decided to settle in Kolhapur, where they got shelter in the verandah of a learned Brahmin named Bahirambhat. But, of all the places they visited, Bahina liked Pandharpur the best. She was fascinated by the idol of Lord Vithoba and thrilled to hear the Abhangas by Tukaram.

Very soon Bahirambhat received the gift of a cow and a calf which, in response to his dream, he offers to Ratnakar. Bahina and Ratnakar. They took great care of the cow. The calf took a great liking for Bahina and followed her wherever she went. Once it so happened that Jayaram-swami, a well-known Kirtankar performer of kirtans or devotional musical discourses) had come to Kolhapur. Bahina attended the kirtans with her family, and as usual, the calf followed her to the kirtan. Jayaram Swami noticed this and appreciated the bond between the calf and Bahina, but the people around thought that the calf had strayed into the pandal and drove it out. Noticing this, Jayaram Swami called the calf back and patted both the calf and Bahina. Some people around at the time of the incident don't take kindly to the Swami's chidings, and complain to Bahina's husband, Ratnakar, does not approve of the attention shown by Swami on Bahina and beat her severely. The calf unable to bear the ill-treatment meted to Bahina, gives up eating thus giving up her life.

Grief-stricken, Bahina falls unconscious for three days on hearing about the calf's death. On regaining consciousness, she finds herself surrounded by her family, but Bahina was a changed person. She had experienced enlightenment in her unconscious state and had seen Lord Vithal before her. She had also seen Sant Tukaram. She becomes a devotee of Lord Vithal and spents her time singing Tukaram's abhangas. On hearing this, Jayaram Swami tells Ratnakar that his wife Bahina was no ordinary woman but a saint and Yoga-brastha (a former yogi under a temporary lapse) and that he was very fortunate in having her as a wife.

The fame of Bahina's devotional music spread far and wide, but Ratnakar consumed by jealousy, decides to leave her. On hearing this, Bahina was determined to give up her life in case he did leave her. And strangely enough, before leaving the house Ratnakar was taken suddenly ill and was in great agony. Bahina nursed him patiently day and night which made Ratnakar realize his mistakes, more so since he had abused not just another mortal, but a saint. After Ratnakar recovers his health, the whole family shifts to Dehu. In Dehu, they wanted to shift to locality of Mumbaji, but were refused admission because he was against them, being devotees of Tukaram, who was of a low caste. But this time Ratnakar stood by his wife and she came to be respected even more. They were given a place to stay in the temple of Tukaram. Here they regularly listened to Tukaram's abhangas and kirtans, and Bahinabai thought herself most fortunate because she could hear Tukaram's Abhangas day and night. Since then Ratnakar also became a devotee of Tukaram.

The couple Bahinabai and Ratnakar lived quite happily in the premises of the temple but Mumbaji could not bear to see their happiness. Once he drags their cow, ties it in his house and thrashes it severely which the people around can't bear to see, and beat him. However, Bahinabai intervenes in the nick of time and saves Mumbaji, who repents for his wrong doings and becomes a follower of Bahinabai. In Dehu Bahinabai gives birth to a daughter, Kashi and son, Vithoba, who becomes a great poet and kirtankar like her in the future.

One day, in the absence of her husband, Bahinabai goes to pilgrim quarters and meditates continuously for three days. At the end of the meditation, she felt as though Tukaram himself had placed his hand on her head, blessed her and asked her to compose. It was a transcendental event for her. Overjoyed, she went to bathe in the river and as she came out, words flowed from her mouth. With the blessings of Tukoba, she got full inspiration to compose devotional songs. She began composing abhangas on spiritual subjects.

In many of her abhangas she has expressed on how she attained knowledge of Advaita Vedanta. She lived till 72 years. In her verses, her last message to her son gives description of her previous thirteen births and it is said she knew beforehand the time of her death. It is surmised that she had initiated disciples too. Deenakavi, the author of Panchkaran Mahavakya, was one of her disciples. A collection of her abhangas, songs and poems has been published in a book form by Shri Umarkhani. Bahinabai has specifically acknowledged Tukaram as her Guru and that he initiated her has been clearly expressed in all her Abhangas.

http://www.hindupedia.com/en/Sant_Bahinabai

# ॥संत बहिणाबाईचे अभंग॥

---------------- १ ----------------

आदिनाथें उपदेश पार्वतीस केला । मत्स्येंद्रें ऐकिला मच्छगर्भी ॥ १ ॥

शिवहृदयींचा मंत्र पैं अगाध । जालासे प्रसिद्ध भक्तियोगें ॥ २ ॥

तेणें त्या गोरक्षा केलें कृपादान । तेथोनी प्रकट जाण गहिनीप्रती ॥ ३ ॥

गहिनीनें दया केली निवृत्तिनाथा । बाळक असतां योगरूप ॥ ४ ॥

तेथोनि ज्ञानेश पावले प्रसाद । जाले ते प्रसिद्ध सिद्धासनीं ॥ ५ ॥

'सच्चिदानंद बाबा' भक्तीचा आगरू । त्यासी अभयवरू 'ज्ञाने' केला ॥ ६ ॥

पुढें विश्वंभर शिवरूप सुंदर । तेणें राघवीं विचार ठेविलासे ॥ ७ ॥

केशव चैतन्य बाबाजी चैतन्य । झालेसे प्रसन्न 'तुकोबासी' ॥ ८ ॥

एकनिष्ठ भाव तुकोबा-चरणीं । म्हणोनी 'बहिणी' लाधलीसे ॥ ९ ॥

---------------- २ ----------------

उघडोनी नेत्र पाहे जंव पुढें । तंव दृष्टी पडे पांडुरंग ॥ १ ॥

देखिली पंढरी ध्याना तेची येत जयराम दिसत दृष्टीपुढें ॥ २ ॥

ब्राह्मण स्वप्नांत देखिला तो जाण । त्याची आठवण मनीं वाहे ॥ ३ ॥

न दिसे आणिक नेत्रांपुढें जाण । नामाचें स्मरण मनीं राहे ॥ ४ ॥

पूर्वील हरिकथा आयकिल्या होत्या । त्या मनीं मागुत्या आठवती ॥ ५ ॥

तुकोबाची पदें अद्वैत प्रसिद्ध । त्यांचा अनुवाद चित्त झुरवी ॥ ६ ॥

ऐसीं ज्याचीं पदें तो मज भेटतां । जीवास या होतां तोष बहु ॥ ७ ॥

तुकोबाचा छंद लागला मनासी । ऐकतां पदांसी कथेमाजीं ॥ ८ ॥

तुकोबाची भेटी होईल ते क्षण । वैकुंठासमान होये मज ॥ ९ ॥

तुकोबाची ऐकेन कानीं हरिकथा । होय तैसें चित्ता समाधान ॥ १० ॥

तुकोबाचें ध्यान करोनी अंतरीं । राहे त्याभीतरीं देहामाजीं ॥ ११ ॥

बहिणी म्हणे तुका सद्गुरु सहोदर । भेटतां अपार सुख होय ॥ १२ ॥

---------------- ३ ----------------

मच्छ जैसा जळावांचोनी तडफडी । तैसीच आवडी तुकोबाची ॥ १ ॥

अंतरींचा साक्षी असेल जो प्राणी । अनुभवें मनीं जाणेल तो ॥ २ ॥

तृषितांसी जैसें आवडे जीवन । तैसा पिंड प्राणावीण तया ॥ ३ ॥

बहिणी म्हणे हेत तुकोबांचे पायीं । ऐकोनिया देहीं पदें त्यांचीं ॥ ४ ॥

---------------- ४ ----------------

संचितासी दग्ध करी ऐसा कोण । सद्गुरुवांचोन जाण मना ॥ १ ॥

यालागीं सद्गुरु असावा उत्तम । जेणें निमे श्रम संसाराचा ॥ २ ॥

त्रिविध तापासी कोण करी शांत सद्गुरु एकान्त न जोडतां ॥ ३ ॥

जन्ममरणाची कथा कैं निवारे । सद्गुरु निर्धारें न भेटतां ॥ ४ ॥

वासना निःशेष निवारेल तेव्हां । भेटेल तुकोबा सद्गुरु तो ॥ ५ ॥

बहिणी म्हणे माझा जाऊं पाहे जीव । का हो न ये कींव तुकोबा ॥ ६ ॥

---------------- ५ ----------------

न बोलवे शब्द अंतरींचा धावा । नायके तुकोबा काय कीजे ॥ १ ॥

अदृष्ट करंटें साह्य न हो देव । अंतरींची हांव काय करूं ॥ २ ॥

तेरा दिवस ज्यानें वह्या उदकांत । घालोनियां सत्य वाचविल्या ॥ ३ ॥

महाराष्ट्री शब्दांत वेदान्ताचा अर्थ । बोलिला लोकांत सर्वद्रष्टा ॥ ४ ॥

अंतर साक्ष आहे निरोपणीं हेत । जडे परी चित्त वोळखेना ॥ ५ ॥

बहिणी म्हणे मीच असेन अपराधी । अध्याय त्रिशुद्धी काय त्यांचा ॥ ६ ॥

---------------- ६ ----------------

बहुत अंतरीं शोक आरंभिला । कां मज विठ्ठला मोकलिलें ॥ १ ॥

त्रिविध तपानें तापलें मी बहु । जाईना कां जीऊ प्राण माझा ॥ २ ॥

तंव अकस्मात सातविया दिनीं । नामसंकीर्तनीं घोषयुक्त ॥ ३ ॥

तुकाराम रूपें येवोनी प्रत्यक्ष । म्हणे पूर्वपक्ष सांभाळींजे ॥ ४ ॥

नको करूं चिंता असें मी तुजपाशीं । घेईं अमृताशी हातींचीया ॥ ५॥

गाय केलें वत्स मुखीं निघे धार । अमृत हें सार सेवीं हेंची ॥ ६ ॥

ठेवोनियां कर मस्तकीं बोलिला । मंत्र सांगितला कर्णरंध्रीं ॥ ७ ॥

म्यांही पायांवरी ठेविलें मस्तक । दिधलें पुस्तक मंत्र गीता ॥ ८ ॥

कार्तिकांत वद्य पंचमी रविवार । स्वप्नींचा विचार गुरुकृपा ॥ ९ ॥

आनंदले मन चिद्रूपीं कोंदलें । उठोनि बैसलें चमत्कारें ॥ १० ॥

मंत्र आठविती तुकोबास्वरूपा । स्वप्नामाजीं कृपा पूर्ण केली ॥ ११ ॥

अमृत पाजिलें चवीं अनारिसीं । साक्ष ज्याची त्यासी मनामाजीं ॥ १२ ॥

बहिणी म्हणे ऐसी कृपा सद्गुरूची । तुकारामें साची पूर्ण केली ॥ १३ ॥

---------------- ७ ----------------

जालें समाधान ब्राह्मणाच्या शब्दें । स्वप्नामाजीं पदें आठविती ॥ १ ॥

परी अंतरींच तुकोबाचें ध्यान । दर्शनावांचोन करितसें ॥ २ ॥

जयाचिया पदें होतसे विश्रांती । तेचि देहाकृति विठ्ठलाची ॥ ३ ॥

विठ्ठलासी तया नाहीं भेदभाव । ऐसे माझें मन साक्ष आहे ॥ ४ ॥

पांडुरंग तुका पांडुरंग तुका । वेगळीक देखा होय केवीं ॥ ५ ॥

कलियुगीं बौद्धरूप धरी हरी । तुकोबा शरीरीं प्रवेशला ॥ ६ ॥

तुकोबाची बुद्धि पांडुरंग रूप । मन तें स्वरूप तुकोबाचें ॥ ७ ॥

तुकोबाचे सर्व इंद्रियचालक । पांडुरंग देख सत्य आहे ॥ ८ ॥

तुकोबाचे नेत्र तेही पांडुरंग । श्रोतृ ते अभंगरूप त्याचे ॥ ९ ॥

तुकोबाचे हात लिहिताती जें जें । तेंचि तें सहजें पांडुरंग ॥ १० ॥

सर्वही व्यापार तुकोबाचे हरी । आपणचि करी अद्‌वयत्वें ॥ ११ ॥

बहिणी म्हणे रूपें व्यापक 'तुका' वा । ध्यान माझ्या जीवा हेंचि पाहे ॥१२॥

---------------- ८ ----------------

भ्रतारें टाकिलें मोट बांधोनिया । न सोसी ते तया क्लेशावस्था ॥ १ ॥

चतुर्थ दिवशीं जीव टाकियेला । विठ्ठलें दाविला चमत्कारु ॥ २ ॥

ब्राह्मणाच्या रूपें येवोनी सांगत । सावधान चित्त करीं पुढें ॥ ३ ॥

अंतरीं सावध होउनी राहिलें । चित्त म्यां गोविलें तुकोबासी ॥ ४ ॥

वत्स गेलीयासी दिवस सातवा । येवोनी तुकोबा स्वप्नामाजीं ॥ ५ ॥

केले समाधान पाजिलें अमृत । वत्सासी करीत गाय भेटी ॥ ६ ॥

अमृता पाजोनी सांगितला मंत्र । जो कां हा सर्वत्र लोक जपती ॥ ७ ॥

मस्तकीं हस्तक ठेवोनिया कृपा । केली त्या स्वरूपा तोची जाणे ॥ ८ ॥

कृपेचा महिमा आहे तो अपार । वत्स बोले सार श्लोकअर्थ ॥ ९ ॥

आठवे दिवशीं सावध इंद्रियें । अमृतें धालिये तुकोबाच्या ॥ १० ॥

तेधवां ती गाय देखिली सन्मुख । निमालीसे देख वत्स कळे ॥ ११ ॥

म्हणे या वत्सातें पाजिलें अमृतु । तयासी तो मृत्यु कदां नोहे ॥ १२॥

अमर तें वत्स आहे मजपासीं । चित्त अमृतासी घेत गोडी ॥ १३ ॥

बहिणी म्हणे इतुकें वर्तलीयावरी । पुढेंही विस्तारीं सांगिजेल ॥ १४ ॥

---------------- ९ ----------------

जयराम समर्थ ज्ञानाचा सागर । साक्ष तें अंतर त्याचें तया ॥ १ ॥

बोलाविलें तेणें हिरंभटाप्रती । माझी तया स्थिती पुसीयेली ॥ २ ॥

सांगितला तेणें वृत्तान्त सर्वही । वर्तला जो कांहीं गृहीं त्याचें ॥ ३ ॥

स्वप्नागत गुरु तुकोबाचे रूपें । स्वप्नींचिये कृपें बोध केला ॥ ४ ॥

सावध होउनी ते मुली बैसली । गायीस गौरविली कुर्वाळूनी ॥ ५ ॥

दुग्ध दोहोनिया घेतलें तियेनें । पाणी आणी तृणें भक्षीतसे ॥ ६ ॥

परी तें मुलीचें रूप पालटलें । पूर्ण तें दाटलें ह्रदय तिचें ॥ ७ ॥

तुकोबाचा छंद अंतरीं लागला । मायबापें तिला सांगताती ॥ ८ ॥

भ्रतार हा तिचा वेडावला राहे । उगाची तो पाहे तियेकडे ॥ ९ ॥

छांदिष्टा होउनी बैसली घरांत । तुकोबासी चित्त लावुनीया ॥ १० ॥

ऐसा हा वृत्तांत हिरंभट सांगे । जयराम निजांगे संतोषला ॥ ११ ॥

बहिणी म्हणे ऐसा निर्धार ऐकोनी । जयराम स्वामींनीं कृपा केली ॥ १२ ॥

---------------- १० ----------------

मजवरी दृष्टी कृपेची ओतिली । प्रेमाची गुंतली माय जैसी ॥ १ ॥

अंतरींची पूजा घेऊनी जयराम । गेला तो सप्रेम स्वस्थाना ॥ २ ॥

उगाची बैसला आसनीं समस्त । करोनियां स्वस्थ चित्तवृत्ति ॥ ३ ॥

तव कांहीं एक अपूर्व वर्तलें । तुकारामें दिलें दर्शनासी ॥ ४ ॥

केला नमस्कार भेटुनी आनंदें । अत्यंत आल्हादें स्वामी सखा ॥ ५ ॥

मजही दर्शन दिधलें अळुमाळ । घातला कवळ मुखामाजीं ॥ ६ ॥

मज म्हणे आलों जयराम भेटीसी । तुजही मानसीं ओळखिलें ॥ ७ ॥

तुम्ही आतां येथें नको राहों कदा । आत्मज्ञानबोधा न संडी वो ॥ ८ ॥

बहिणी म्हणे दर्शन दुसरें । मनाच्या व्यापारें तुकोबाचें ॥ ९ ॥

---------------- ११ ----------------

भ्रतारें वैराग्य घेतलीया वरी । जीव हा निर्धारीं देईन मी ॥ १ ॥

वत्सा साठीं देह अचेतन पडे । हें तंव रोकडें परब्रह्म ॥ २ ॥

भ्रताराचें तीर्थ न सांपडे जरी । अन्न खाय तरी मांस आम्हां ॥ ३ ॥

भ्रताराचें शेष न सांपडे तरी । पापें माझ्या शिरीं त्रैलोक्याचीं ॥ ४ ॥

चित्त हें भ्रताराविण जरी जाये । तरी वास होय नरकीं आम्हां ॥ ५ ॥

भ्रतारदर्शनाविण जाय दीस । तरी तेचि रास पातकांची ॥ ६ ॥

बहिणी म्हणे मज आज्ञाची प्रमाण । ब्रह्म सनातन स्वामी माझा ॥ ७ ॥

---------------- १२ ----------------

पाषाण विठ्ठल स्वप्नांतील तुका । प्रत्यक्ष कां सुखा अंतरावें ॥ १ ॥

घेईन उदंड सेवासुख देहीं । साक्ष या विदेही आहे मज ॥ २ ॥

भ्रताराची सेवा पतिव्रता करी । तरी ती उद्धरी उभय कुळें ॥ ३ ॥

बहिणी म्हणे माझ्या जीवाची विश्रांति । भ्रतारें समाप्ती जन्ममृत्यु ॥ ४ ॥

---------------- १३ ----------------

भ्रतारें निश्चय केला मनामाजीं । जावें उद्या आजि टाकोनीया ॥ १ ॥

तंव त्यासी व्यथा जाली शरिरास । झाला सात दिवस ज्वाळ देहीं ॥ २ ॥

ओळखीचे जन नायके उत्तर । आपण अहोरात्र तयापासीं ॥ ३ ॥

दिधल्या औषध नेदी तया मान । जीव व्यथा फार पूर्ण सोसी ॥ ४ ॥

एक मासवरी अन्न विवर्जीत । व्यथा हे अद्भुत सोसीतसे ॥ ५ ॥

नाना देव कुळें देवतांची भाष । ठेविल्या विशेष बहु कांहीं ॥ ६ ॥

परी तया व्यथेलागीं न ये गुण । म्हणे तो मरण आलें मज ॥ ७ ॥

काय पांडुरंगा तुकोबासी निंदी । व्यथा तेचि संधि आली मज ॥ ८ ॥

जरी तुकाराम निंदिला त्यागुणें । असेल दुखणें व्यथा मज ॥ ९ ॥

तरी चमत्कार दाखवावा सध्यां । जीवीं विश्ववंद्या तुकारामा ॥ १० ॥

बहिणी म्हणे झाला अनुताप भ्रतारा । पांडुरंग पुरा अंतरसाक्ष ॥ ११ ॥

वृद्धसा ब्राह्मण येऊनी बोलतु । म्हणे कां रे मृत्यु इच्छितोसी ॥ १ ॥

वैराग्य कां तुज आले असें मना । स्त्रीचा त्याग कोणा गुणें केला ॥ २ ॥

आधीं इचा विचारीं अपराध अंतरीं । मग कोपा करीं प्रवर्तावें ॥ ३ ॥

वांचण्याची इच्छा असलिया मानसीं । तरी तूं इयेसी अंगिकारीं ॥ ४ ॥

स्वधर्माविरहित वर्तेल ही जरी । तरी तिचा करीं त्याग वेड्या ॥ ५ ॥

ही आहे विरक्त निश्चिती हरिभक्त । तुवां पाहीं सत्य तैसें व्हावें ॥ ६ ॥

होईल कल्याण बोलत ब्राह्मण । भ्रतारें चरण वंदियेले ॥ ७ ॥

सांगितलें सर्व कारण आपण । देईं जीवदान आजी मज ॥ ८ ॥

ये व्यथेपासोनी वांचवीं स्वामीया । जीव तुझ्या पायां वाहीन मी ॥ ९ ॥

स्त्रियेसी सर्वथा न बोले आपण । हरीसी शरण जीवेंभावें ॥ १० ॥

केला नमस्कार प्रत्यक्ष उठोन । होईल कल्याण म्हणे द्विज ॥ ११ ॥

ऐकतें मीही दोघांचें बोलणें । घालीं लोटांगणें भ्रतारासी ॥ १२ ॥

झाला तो अदृश्य ब्राह्मण तात्काळ । आरोग्य कुशल देह झाला ॥ १३ ॥

बहिणी म्हणे देव कृपा करी तरी । सर्व सिद्धी द्वारीं तिष्ठतील ॥ १४ ॥

---------------- १५ ----------------

आरोग्य तात्काळ व्यथेचा हारास । झाला दिसंदीस भ्रताराचा ॥ १ ॥

मग करी कृपा बोले समाधानें । द्वेषाचें हें ठाणें दूर केलें ॥ २ ॥

म्हणे आतां सर्व जावें येथुनियां । आपुलीया ठाया स्वस्थानां ॥ ३ ॥

देवें आपणासी ब्राह्मणाच्या वेषें । सांगितला शेष प्राक्तनाचा ॥ ४ ॥

तेंचि आतां करूं हरीची वो भक्ती । मिरासींची खंती वाटियेली ॥ ५ ॥

माझीं मायबापें तयांसी सांगत । तुम्ही जा निवांत देवगांवा ॥ ६ ॥

आपण अरण्यात दोघे करूं वास । देवाच्या बोलास धरोनीया ॥ ७ ॥

होवो आतां कल्याण किंवा अकल्याण । आम्ही तों संपूर्ण भक्ती करूं ॥८॥

तुकोबाचे गांवा जाऊनीया राहों । मनींच दृढावो धरोनीया ॥ ९ ॥

ऐसी पालटली भ्रताराची बुद्धि । स्वामी कृपानिधी अंतरसाक्ष ॥ १० ॥

काय एक देव करील तें नव्हे । प्रत्यक्ष अनुभवें सर्वजनां ॥ ११ ॥

बहिणी म्हणे अवघी चालिलों । तुकोबाच्या आलों दर्शनासी ॥ १२ ॥

---------------- १६ ----------------

वत्साचिये माय कपिला सांगातें । धांवे एकचित्तें आम्हांपुढें ॥ १ ॥

मायबाप बंधु भ्रतारासहित । इंद्रायणी जेथ तेथें आलों ॥ २ ॥

करोनीया स्नान पांडुरंगभेटी । आनंदली सृष्टी अंतरंगें ॥ ३ ॥

तुकोबा आरती करीत होते तेथ । नमस्कारें स्वस्थ चित्त केलें ॥ ४ ॥

स्वप्नीं जो देखिला तेंच ध्यान तेथें । देखिलें नेमस्त पूर्ण दृष्टी ॥ ५ ॥

बहिणी म्हणे तेथ भ्रतारें साष्टांग । केला अंतरंग भावयुक्त ॥ ६ ॥

---------------- १७ ----------------

मंबाजी गोसावी त्या स्थळीं नांदतां । गृह प्रवेशतां देखियेले ॥ १ ॥

जाऊनी तयासी मागितलें स्थळ । तो अति चंचळ क्रोध तया ॥ २ ॥

मारावया उठे घातलें बाहेरी । आनंदें वो वरी प्रार्थियेलें ॥ ३ ॥

तेथें राहोनिया भोजनासी गेलों । बहुत पावलों समाधान ॥ ४ ॥

वृत्तान्त पुसीला कोठोनि आलांत । चालतसा पंथ कवण कार्या ॥ ५ ॥

कांहींबाही तया सांगितलें पूर्व । म्हणे रहा सर्व पर्वणीसी ॥ ६ ॥

सोमवरीं आहे अमावस्या पुढें । रहा भक्तिकोडें सुख घ्यावें ॥ ७ ॥

नित्य हरिकथा होतसें देऊळीं । तुकोबा माऊली वैष्णवीची ॥ ८ ॥

रहा येथें तुम्हां भक्षावया धान्य । देऊं हेंही पुण्य आम्हां घडे ॥ ९ ॥

बहिणी म्हणे मग राहिलों देहूस । धरूनी हव्यास तुकोबाचा ॥ १० ॥

---------------- १८ ----------------

देऊळांत कथा सर्व काळ होत । श्रवण करीत दिनरात्रीं ॥ १ ॥

तुकोबाची कथा वेदांतील अर्थ । पावे माझें चित्त समाधान ॥ २ ॥

तुकोबाचें ध्यान पूर्वी कोल्हापुरीं । जें स्वप्नामाझारीं देखियेलें ॥ ३ ॥

तेंचि ध्यान डोळां प्रत्यक्ष देखोनी । आनंद लोचनीं हेलावत ॥ ४ ॥

रात्रंदिन निद्रा न ये तिळभरी तुकोबा अंतरीं प्रवेशला ॥ ५ ॥

बहिणी म्हणे येती सुखाचे डोलावे । जाणती अनुभवे जाणते जे ॥ ६ ॥

---------------- १९ ----------------

आपाजी गोसावी पुण्यांत रहात । जो अति विख्यात राजयोगी ॥ १ ॥

तयाप्रती पत्र मंबाजी पाठवी । तुकोबा गोसावी शूद्रवाणी ॥ २ ॥

कथा करितसे देऊळीं सर्वदा । द्विज त्याच्या पदा लागताती ॥ ३ ॥

रामेश्वर भट अति योगी थोर । तेही नमस्कार त्यांसी करिती ॥ ४ ॥

आम्हांसी अन्याय हाची थोर वाटे । होत असें खोटें वेदवाक्य ॥ ५ ॥

तुम्ही थोर आहां दंड करावया । बांधोनीया तया न्यावें तेथें ॥ ६ ॥

आणीक ही एक स्त्री-पुरुष आहेती । तेही म्हणविती शिष्य त्याचे ॥ ७ ॥

म्हणविती ब्राह्मण आहेती सोनार । कुळकर्णी ही फार मान्य केले ॥ ८ ॥

स्वधर्माचा लोप होतसे देखोन । धाडिलें लिहोन म्हणोनिया ॥ ९ ॥

याचा कीं अपमान न करितां जाण । राज्यही बुडोन जाय तरी ॥ १० ॥

डोंबाळें मांडून स्वधर्म लोपला । पाहिजे रक्षिला स्वामीराजें ॥ ११ ॥

बहिणी म्हणे ऐसें पत्र पाठविलें । चोरोनी लिहिलें घरामाजीं ।

---------------- २० ----------------

आपाजी गोसावी वाचोनीया पत्र । क्रोधें फार नेत्र भोवंडीत ॥ १ ॥

शुद्र होवोनिया नमस्कार घेत । पाप हें अद्‌भुत होत असे ॥ २ ॥

सोनाराच्या जाती म्हणविती ब्राह्मण । तयाचें दर्शन घेऊं नये ॥ ३ ॥

शूद्राचा अनुग्रह घेताती ब्राह्मण । भ्रष्टाकार पूर्ण होत असे ॥ ४ ॥

त्यासी शिक्षा द्यावी दोष नाहीं यासी । ऐसा निश्चयेंसी नेम केला ॥ ५ ॥

बहिणी म्हणे याचें प्रत्युत्तर लिहिलें । होय यथाकालें कार्यसिद्धी ॥ ६ ॥

---------------- २१ ----------------

कोल्हापुरीं गाय होती जे सांगाते । कांहीं तें दुग्धातें देत होती ॥ १ ॥

गाय ते बांधोनी घातकी घरांत । सोटेही मारीत तयेलागीं ॥ २ ॥

पाहों गाय तंव न दिसे पाहतां । तुकोबासी व्यथा तेचि झाली ॥ ३ ॥

पाहातोसी काय होत असे कष्टी । तीन रात्री खुंटी बांधलीसे ॥ ४ ॥

नाहीं तृण पाणी मारिलेंसें फार । धांवण्यासी थोर नाहीं दिसे ॥ ५ ॥

तुकोबा जागृत झाले तंव पाठ । सुजेली ती नीट होयेची ना ॥ ६ ॥

सोटे अंगावरी दिसती तुकोबा । आठवी विठोबा नानापरी ॥ ७ ॥

देखोनी तयासी कष्ट होती जनां । सांगितलें स्वप्नांतील सर्व ॥ ८ ॥

तुकोबा अंतरीं आठवुनी देवा । धांव रे माधवा सोड म्हणे ॥ ९ ॥

कोणें गाय कोठें बांधिली कळेना । धांव नारायणा गाय रक्षीं ॥ १० ॥

तंव अकस्मात तयाचिये गृहीं । अग्नि लागे तोही महाथोर ॥ ११ ॥

धांवोनिया लोक विझविती अग्नि । गाय ते निमग्नीं बैसलीसे ॥ १२ ॥

जे गाय पहाती आजी तीन दिवस । चांडाळें तियेस बांधिलेंसें ॥ १३ ॥

गाय सोडोनिया आणिली बाहेरी । तंव पाठिवरी मारिलेंसे ॥ १४ ॥

भ्रतार आपुला बोलावुनी पाहे । गाय सांभाळीं हें ब्राह्मणा तूं ॥ १५ ॥

तुकोबा धांवोनी करी प्रदक्षिणा । नमस्कारी गुणा धन्य तुझे ॥ १६ ॥

दाखविलें स्वप्न मज गाय तुवां । न कळेचि धांवा केला माझा ॥ १७ ॥

तुझा माझा एका आत्मा सर्वांगत । ते साक्ष निश्चित आली मज ॥ १८ ॥

ऐसा तुकोबानें केला फार धांवा । तंव माझ्या जीवा दुःख झालें ॥ १९ ॥

मजही तैसेची क्लेश झाले फार । साक्ष हें अंतर विठ्ठलाचें ॥ २० ॥

तुकोबाचे पाठी पाहाताती जन । गायही देखोन थोर कष्टी ॥ २१ ॥

बहिणी म्हणे ऐसें वर्तलें हें जाण । गायीचें निर्वाण हरी जाणे ॥ २२ ॥

---------------- २२ ----------------

रामेश्वरभट्टें ऐकिला वृत्तान्त । धांवोनी त्वरीत तेथ आला ॥ १ ॥

तुकोबाचें तींहीं घेतलें दर्शन । गाय तेही पूर्ण पाहियेली ॥ २ ॥

दोहीचे पाठीचा दिसे एक भाव । रुदनीं ते सर्व प्रवर्तले ॥ ३ ॥

तुकोबाचे पार वर्णिलासा कोण । कलियुगीं जाण प्रल्हाद हा ॥ ४ ॥

सर्वांतर साक्षी करोनीया स्तुती । स्वमुखें रमती आपुलिया ॥ ५ ॥

बहिणी म्हणे लोक बोलती सकळ । तुकोबा केवळ पांडुरंग ॥ ६ ॥

---------------- २३ ----------------

तुटकें संचित जालें शुद्ध चित्त । अंतरींचा हेत ओळखिला ॥ १ ॥

कृपा केली देवें इंद्रायणीतीरीं । देहुग्रामीं थोर भक्तिपंथ ॥ २ ॥

तेथें पांडुरंग देवाचें देऊळ । राहावया स्थळ प्राप्त झालें ॥ ३ ॥

तुकाराम संत संताचें कीर्तन । तिन्ही काळ तीन दृष्टीपुढें ॥ ४ ॥

नमस्कार तया न घडे पतिभयें । परि चित्त राहे सदा पायीं ॥ ५ ॥

बहिणी म्हणे ऐसे मास झाले सात । अवघेंची संचीत सरो आलें ॥ ६ ॥

---------------- २४ ----------------

आनंदवोवरी होती तये ठायीं । वाटे तेथें कांहीं बसावेंसें ॥ १ ॥

करूनिया ध्यान लावावें लोचन । करावें स्मरण विठोबाचें ॥ २ ॥

तुकाराम तंव देखतां देखत । आले अकस्मात गुरूरूपें ॥ ३ ॥

बहिणी म्हणे तेथ पुसोनी मातेसी । क्रमियेल्या निशी तीन तेथं ॥ ४ ॥

नेणें जप तप नेणें अनुष्ठान । घालावें आसन कळेना तें ॥ १ ॥

ध्यानाचें लक्षण इंद्रियांचारोध । नाहीं याचा बोध ऐकियेला ॥ २ ॥

पाषाणप्रतिमा विठोबाचें ध्यान । ह्रदयीं चिंतन राममुद्रा ॥ ३ ॥

तुकारामकथा करावी ती द्वारीं । ऐसा हा अंतरीं हेत होता ॥ ४ ॥

---------------- २६ ----------------

टाळ्या चिपोळ्यांचा ध्वनी आयकतां । आनंद हा चित्तां सामावेना ॥ १ ॥

लावियेले नेत्र निद्रेंत जागृती । तुकाराममूर्ति देखियेली ॥ २ ॥

ठेवियेला हस्त मस्तकीं बोलून । दिधलें वरदान कवित्वाचें ॥ ॥

बहिणी म्हणे नेणें स्वप्न कीं जागृती । इंद्रियांच्या वृत्ती वोसरल्या ॥ ४ ॥

---------------- २७ ----------------

आनंदे सद्‌गद जाहलीं इंद्रियें । तुकारामपाय आठवले ॥ १ ॥

होऊनी सावध उघडिले नेत्र । आठवला मंत्र षडक्षरी ॥ २ ॥

ठसावला ध्यानीं मनाचिये ठायीं । आणिक काहीं आठवेना ॥ ३ ॥

बहिणी म्हणे हात घातला मस्तकीं । देह तो या लोकीं आढळेना ॥ ४ ॥

---------------- २८ ----------------

तें सुख सांगतां वाचे पडे मौन । जाणता ते धन्य गुरुभक्त ॥ १ ॥

झालासे आनंद इंद्रियाचे द्‌वारीं । बैसलें शेजारीं चैतन्याचे ॥ २ ॥

घट हा बुडावा जैसा डोहाआंत । न फुंटतां ओतप्रोत पाणी ॥ ३ ॥

बहिणी म्हणे तैसें झालें माझें मना । तुकाराम खुणा ओळखी त्या ॥ ४ ॥

---------------- २९ ----------------

वाटे उठों नये जीव जाय तरी । सुख तें अंतरी हेलावलें ॥ १ ॥

आनंदे निर्भर होउनीया मन । करूं आलें स्नान इंद्रायणी ॥ २ ॥

घेतलें दर्शन पांडुरंगमूर्ती । तंव झाली स्फूर्ति वदावया ॥ ३ ॥

तुकोबासी तेथें करुनी नमस्कार । आलें मी सत्वर बिऱ्हाडासी ॥ ४ ॥

बहिणी म्हणे जैसा लोटला समुद्र । हृदयाकाशीं इंद्र बोले वाचा ॥ ५ ॥

गुरुपरंपरा आम्हां चैतन्य बळी ।

तयाचें स्मरणें आम्ही वैकुंठीं बळी ॥ १ ॥

नमस्कार हा तया साष्टांग माझा ।

वोवाळूं जीवें साधु चैतन्य राजा ॥ २ ॥

चैतन्य सर्वगत व्यापक सद्‌गुरु ।

प्रगटला हा 'तुकाराम' वेषें दातारु ॥ ३ ॥

तयाचें हें ध्यान सदा माझिये अंतरीं ।

अंतरीचें ध्यान 'तुका' सबाह्याभ्यंतरीं ॥ ४ ॥

नेणे स्नान दान जप आसन मुद्रा ।

सदा सर्व काळ ध्याऊं चैतन्यपदां ॥ ५ ॥

बहिणी म्हणे मुक्त आम्ही सद्‌गुरूचे ध्यानें ।

प्रेमें भक्तिभावें तया वोवाळूं प्राणें ॥ ६ ॥

---------------- ३१ ----------------

संतकृपा झाली । इमारत फळा आली ॥ १ ॥


ज्ञानदेवें रचिला पाया । उभारिलें देवालया ॥ २ ॥

नामा तयाचा किंकर । तेणें रचिलें तें आवार ॥ ३ ॥

जनार्दन एकनाथ । खांब दिधला भागवत ॥ ४ ॥

तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ॥ ५ ॥

बहिणी म्हणे फडकती ध्वजा । निरूपणा केलें वोजा ॥ ६ ॥



# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी. २३०० वर्षं ज्या भाषेत जनव्यवहार आणि ज्ञानव्यवहार चालू आहेत अशी भाषा. गाथा सप्तशती पासून ते ज्ञानोबा तुकोबा आणि आताच्या तरूण लेखकांच्या प्रतिभेचा अखंड झरा ज्या भाषेतून वाहतो आहे. अशा भाषेला इंटरनेटच्या काळात झुळझुळते ठेवण्याचा यशस्वी प्रयत्न अनेक व्यक्ती व संस्था करीत आहेत. त्यातली एक ई साहित्य प्रतिष्ठान. करोडो पुस्तकांसह इंटरनेट व्यापलेल्या इंग्रजी भाषेसमोर या सर्व संस्थांचे एकत्रित कार्यही खुपच लहान आहे. पण आम्ही आशावादी आहोत. मराठी भाषेतील आत्मगत शक्तीचा पाठिंबा आणि बारा कोटी मराठी लोकांचे पाठबळ या प्रयत्नांच्या पाठीशी आहे. फ़ार पुर्वी लढाया दगड धोंड्यांनी होत. नंतर बाण तलवारींनी होत. नंतर बंदुका रणगाडे आणि विमानांच्या लढाया झाल्या. पण या पुढच्या लढाया बटनांच्या लढाया असणार आहेत. इंटरनेट आणि एकूणच मिडियावर ज्यांची सत्ता ते जेते. अशा काळात इंटरनेटवर मराठी भाषेचे वर्चस्व दिसायला हवे.

आपणा सर्वांचे सहकार्य असेल तर हे अजिबात अशक्य नाही. आपण निदान आपले संत साहित्य तरी प्रत्येक मराठी माणसापर्यंत पोचवू या. महाराष्ट्राच्या गांवोगावी, आणि जगभरातल्या देशोदेशी. ई साहित्य प्रतिष्ठानची पुस्तके मोबाईलवर वाचता येतात. अनेक आघाडीच्या ऍंड्रॉईड ऍप वर ई साहित्य प्रतिष्ठानची पुस्तके उपलब्ध आहेत. एका बटनाच्या अंतरावर. हे वादळ आता घरोघरी जाऊ द्या. आपल्या ओळखीच्या प्रत्येक व्यक्तीला ही गाथा फ़ॉरवर्ड करा. व त्यांचे ई मेल पत्ते esahity@gmail.com वर कळवा. दहाहून जास्त लोकांना पुस्तके पाठवणार्‍यांना किंवा त्यांचे ई मेल पत्ते आम्हाला कळवणार्‍यांना आम्ही ई साहित्यचे VIP सभासद करून घेतो. विनामूल्य.

ई साहित्य प्रतिष्ठानचे आता दोन लाखांहून अधिक वाचक आहेत. सर्वांना सर्व पुस्तकं पाठवणं कठीण आहे. पण VIP सदस्यांना मात्र पुस्तके नित्यनियमाने विनामूल्य विनासायास ई मेलने पाठवली जातील.

VIP सभासद बनणं अगदी सोप्पं आहे. आपल्या ओळखीच्या दहा मराठी लोकांचे मेल आय डी कळवा आणि बना VIP सभासद.

एका दमात तीन कामं.

1. पहिलं म्हणजे तुम्ही VIP सभासद बनता. तुम्हाला ई साहित्य प्रतिष्ठानचं ईपुस्तक इतरांआधी नित्यनियमाने मिळत रहातं. त्यांच्या प्रत्येक कार्यक्रमाचं आमंत्रण मिळतं. त्यांच्या भावी योजनांची माहिती मिळते. त्यांच्या कामात स्वतः सहभागी होण्याची संधी मिळते.

2. ज्या दहा किंवा अधिक लोकांना तुमच्यामुळे फ्री पुस्तकं मिळतात ते खुश होतात. त्यांना त्यांच्या आवडीची पुस्तकं मिळाली की ते इतर लोकांना तुमच्याबद्दल सांगतात. त्यांच्यासाठी तुम्ही म्हणजेच ई साहित्यचे प्रतिनिधी बनता.

3. सर्वात महत्त्वाचं म्हणजे यातून तुम्ही मराठी भाषेच्या संवर्धनाला अमूल्य असा हातभार लावता. आमचा उद्देश आहे मराठीतल्या सहा कोटी साक्षरांना वाचक बनवणं. आणि हे लक्ष्य साध्य करणं हे केवळ आणि केवळ

मराठी लोकांना त्यांच्या भाषेवर असलेल्या प्रेमातूनच शक्य आहे. आपल्या भाषेचं राज्य व्हावं म्हणून १०६ हुतात्मे झाले. आपल्या भाषेनं राजा व्हावं म्हणून आपण दहा-वीस ई मेल आयडी देणारच ना! वाचनाची आवड असो वा नसो. फ़क्त मराठी साक्षर अशा दहा लोकांचे ई मेल पत्ते पाठवा. त्यांना वाचनाची आवड आपोआप लागेल. आपणच लावू. लावूच लावू. करूनच दाखवू.

आहे ना : एक दम : तीन कामं.

संपर्क साधा : esahity@gmail.com

ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे. त्यामुळे आपले मित्र आपल्यावर खुश होतील. शिवाय आम्ही ही खात्री देतो की या ई मेल्सचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी साहित्य पाठवण्यासाठीच केला जाईल. इतर कसल्याही जाहिराती पाठवून त्यांना त्रास दिला जाणार नाही. तेव्हा लवकरात लवकर आपल्या माहितीतल्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या.

अधिक माहितीसाठी, आम्ही कोण ते जाणून घेण्यासाठी एकदातरी www.esahity.com या वेबसाईटला भॆट द्या.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

जय हिंद

जय महाराष्ट्र

टीम ई साहित्य

www.esahity.com वर ई साहित्य प्रतिष्ठानची संपूर्ण माहिती चित्रांसह मिळेल.